**The details of Expression of Interest (EoI) for Loan Borrowing from all the Commercial Banks and Financial Institutions to implement "Maharashtra Urban Infrastructure Development Loan Scheme".**

## 1. Introduction about Structure of Organisation of MUIF, MUIDCL, MUIFTCL.

The Government in Urban Development Department, vide Resolution MRD No.1501/CR.No.252/UD-10 dated 19th July 2002 has decided to set up the Maharashtra Urban Infrastructure Fund, (MUIF) with a view to help the urban local authorities for development of projects and raising finance from financial institutions and the capital market. The Government Resolution envisages the setting up of Maharashtra Urban Infrastructure Fund (MUIF), consisting of a Trust Fund, a Trustee Company, namely the Maharashtra Urban Infrastructure Fund Trustee Company Limited (MUIFTCL) and an Asset Management Company, namely Maharashtra Urban Infrastructure Development Company Limited (MUIDCL)

## 2. Introduction about Scheme.

The Government vide GR no. Nagro-2024/O.N. 386/ UD-33 dated 20th August, 2024 has launched "Maharashtra Urban Infrastructure Development Loan Scheme" to raise loans from public or private sector financial institutions through the open market and make the funds available in the form of loans to urban local bodies for Central sponsored Amrit 2.0 Mission and Swachh Bharat Mission, Nagrotthan Mahabhiyan and other state sponsored schemes are implemented for the development of civil infrastructure in the state. This scheme is implemented by Maharashtra Urban Infrastructure Development Co. Ltd. (MUIDCL) / will be implemented through Maharashtra Urban Infrastructure Fund (MUIF).

Also, vide said GR, Government of Maharashtra has directed MUIDCL/MUIF to raise funds of Rs. 822.22 crore and lend it to Chhatrapati Sambhajinagar Municipal Corporation (CSMC) for its own share to complete the water supply project sanctioned under the Government of India (GoI) sponsored Amrut 2.0 scheme, which amounted to Rs. 2740.75 crore.

## 3.Objective

To implement 'Maharashtra Urban Infrastructure Development Loan Scheme' w.r.t. GR. dated 20th August, 2024, MUIDCL / MUIF should raise funds through loans from public or private sector financial institutions from the open market and lend from the said funds to the Urban Local Self-Government bodies for raising self-share funds in infrastructure development projects / works undertaken by them under Central and State sponsored schemes.

## 4. Borrower Details:

Maharashtra Urban Infrastructure Fund is borrower on behalf of ULB. Maharashtra Urban Infrastructure Fund is Trust Registered Under Indian Trust Act 1882 with a Corpus of Rs. 551 Cr. Contributed by Govt. of Maharashtra & MMRDA.

## 5. Requirement of Loan amount:

Amrut 2.0., Nagorothan & SBM 2.0 under all the scheme projects to the tune of 50 K Cr. are approved and there would be requirement of 10,000 cr. loan. Further, there would be a perpetual requirement of a loan amount of around Rs. 2000 crore annually.

## 6. Term of Loan & Repayment Mechanism:

The term of loan will be for a minimum of 10 years (2 years moratorium + 8 years repayment). However, depending upon the bank policy and cash flow of ULBs, the term of loan will be decided mutually. State will facilitate an escrow mechanism at ULB level for repayment of the loan & interest. Also, in case of any delay in repayment or shortfall of funds (as per the above referred GR), the State will divert various of grants (GST Grant, Finance Commission Grant, Stamp duty Grant etc.) payable to ULBs to ensure uninterrupted repayment of the loan. Further, if required State Govt guarantee will provided.

## 7. Eligibility Criteria:

All Commercial Banks and Financial Institutions.

## 8. Submission Requirements

Details about the required documents and other details for processing the loan proposal and other terms and conditions for loan.

| Term | Term of Loan | Offered Interest Rate (Floting/Fixed) | Moratorium period |
|---|---|---|---|
| Minimum | | | |
| Maximum | | | |

8.1 Extent of Finance
8.2 Drawl period
8.3 Moratorium period
8.4 Repayment Period
8.5 Total Tenure
8.6 Primary Security
8.7 Rate of Interest
8.8 Other Requirements

## 9. Evaluation Criteria

Proposals will be evaluated based on the following criteria:

5.1 Term and conditions for borrowing Loan such as offered rate of interest, loan period, moratorium period, required documents etc. most favourable commercial proposals of one or multiple will be shortlisted

5.2 Commercial Banks and Financial Institutions.

5.3 Approach and methodology.

5.4 Cost-effectiveness of the proposal.

## 10. Submission Deadline

Interested Commercial Banks and Financial Institutions are requested to submit their proposal with Details about the required documents and other details for processing the loan proposal by email on muidcl@gmail.com and personally to the following address and last date of submission 26/12/2024 till 11.00 AM.

To,
Smt. Sunayana Kumbhare,
Chief Operations, MUIDCL
Ground Floor, MUINFRA, CR 2 Building,
Barrister Rajani Patel Rd,
Nariman Point, Mumbai- 400 021,
Tel: 66155652/66157390

## 11. Disclaimer

MUIF, MUIFTCL and MUIDCL reserve the right to accept or reject any or all proposals, to waive any formality in the EoI process, and to request additional information from any Commercial Banks and Financial Institutions. The issuance of this EoI does not constitute an agreement by MUIF or MUIDCL to engage any Commercial Banks and Financial Institutions for borrowing Loan for ULBs.

## 12. Contact Information

For any queries or further information, please contact:

1) Ms. Sunayana Kumbhare
Chief Operation, MUIDCL

2) Shri Tejas Joshi
CA/ Tax Consultant. MUIDCL

Email: muidcl@gmail.com
Tel: 022- Tel: 66155652/66157390/26595997

**नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी "महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कर्ज योजना" राबविण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:- नगरो-२०२४/प्र.क्र.३८६/नवि-३३**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
**दिनांक : २० ऑगस्ट, २०२४**

**प्रस्तावना :-**

राज्यातील नागरी पायाभूत सुविधांच्या विकासासाठी केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियान व स्वच्छ भारत अभियान, नगरोत्थान महाभियान व इतर राज्य पुरस्कृत योजना राबविण्यात येतात. या योजनांच्या वित्तीय आकृतीबंधानुसार शासनाकडून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना विविध पायाभूत सुविधा विकास प्रकल्पासाठी अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यात येते तसेच, संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना देखील सदर प्रकल्पांसाठी स्वहिश्याचा निधी उपलब्ध करुन द्यावा लागतो. तथापि कमकुवत आर्थिक परिस्थितीमुळे बऱ्याच नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना स्वहिश्याचा निधी तातडीने गुंतविणे शक्य होत नाही. केंद्र व राज्य पुरस्कृत योजनेंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना मंजूर केलेले प्रकल्प निधी अभावी रखडून प्रकल्प किंमत वाढू नये यासाठी प्रकल्पांना वेळेत आवश्यक अर्थपुरवठा केल्यास Financial Closure दिल्यास प्रकल्प वेळेत पूर्ण होऊन नागरिकांना देखील सदर पायाभूत सुविधांचे प्रत्यक्ष लाभ देखील वेळीच मिळवून देणे शक्य होणार आहे. या पार्श्वभूमीवर, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना स्वहिश्याचा निधी उभारण्यासाठी कर्ज उपलब्ध करून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याचप्रमाणे, केंद्र पुरस्कृत अमृत २.० योजनेंतर्गत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचा रु. २७४०.७५ कोटी किंमतीचा पाणी पुरवठा प्रकल्प मंजूर असून तो प्रगतिपथावर आहे, या योजनेसाठी महानगरपालिकेस रु. ८२२.२२ कोटी निधी स्वहिश्याच्या स्वरूपात गुंतवावयाचा आहे परंतु, कमकुवत आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना स्व-निधीतून सदर निधी तातडीने उपलब्ध करून देणे शक्य होत नाही. याबाबत मा. उच्च न्यायालयाने देखील शासनाने महानगरपालिकेस या प्रकल्पासाठी कर्ज वा अनुदान स्वरूपात अर्थसहाय्य करण्याचे आदेश पारित केलेले आहेत.

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना केंद्र व राज्य पुरस्कृत योजनांतर्गत मंजूर प्रकल्प / कामातील स्वहिश्याचा निधी उभारण्याकरिता महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कं. लि. (MUIDCL) / महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर फंड (MUIF) मार्फत खुल्या बाजारातून सार्वजनिक अथवा खाजगी क्षेत्रातील वित्तीय संस्थांकडून कर्ज उभारून तो निधी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना कर्ज स्वरूपात उपलब्ध करुन देण्यासाठी "महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कर्ज योजना" राबविण्याची बाब विचाराधीन होती, त्याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :-**

१. राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना केंद्र व राज्य पुरस्कृत योजनांतर्गत मंजूर प्रकल्प / कामातील स्व-हिश्याचा निधी उभारण्यासाठी महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कर्ज योजना राबविण्यास मंजूरी देण्यात येत आहे. ही योजना महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कं. लि. (MUIDCL) / महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर फंड (MUIF) मार्फत राबविण्यात येईल.

२. सदर योजनेकरिता MUIDCL / MUIF ने खुल्या बाजारातून सार्वजनिक अथवा खाजगी क्षेत्रातील वित्तीय संस्थांकडून कर्जाद्वारे निधी उभारावा व सदर निधीतून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना केंद्र व राज्य पुरस्कृत योजनेंतर्गत त्यांनी हाती घेतलेल्या पायाभूत सुविधा विकास प्रकल्पांमधील / कामातील स्व-हिश्याचा निधी उभारण्यासाठी कर्ज द्यावे.

३. नागरी पायाभूत सुविधा विकास निधी (UIDF) योजनेंतर्गत कर्जासाठी अपात्र ठरत असलेल्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रकल्पातील स्व-हिश्याची रक्कम उभारण्यासाठी या योजनेंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना कर्ज अनुज्ञेय राहील.

४. या योजनेंतर्गत प्रकल्पासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने अंतिम केलेल्या निविदा किंमतीच्या (वस्तू व सेवा कर व अन्य शुल्कासह) रक्कमेपैकी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हिश्याच्या रक्कमेपैकी कमाल ७५% मर्यादेपर्यंत MUIDCL / MUIF मार्फत कर्ज उपलब्ध करुन देण्यात येईल.

५. या योजनेंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य **संस्थांना** दिलेल्या कर्जासाठी अधिस्थगन कालावधी (Moratorium) दोन वर्ष व कर्ज परतफेडीचा कालावधी ८ वर्ष असे एकूण १० वर्ष कालवधी राहील, सदर कालावधीत समान हप्त्यात कर्ज व व्याज फेडणे आवश्यक राहील. नागरी स्थानिक स्वराज्य **संस्थांनी** कर्जाची परतफेड करण्यास कसूर केल्यास त्यांना शासनाकडून मिळणाऱ्या वस्तू व सेवा कराचे अनुदान, वित्त आयोगाचे अनुदान, मुद्रांक शुल्क परतावा इ. शासकीय अनुदानातून कर्ज व व्याजाच्या हप्त्याची रक्कम परस्पर वळती करण्यात येईल.

६. या योजनेंतर्गत सहभागी होणाऱ्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे उत्पन्न वाढावे व कर्जाची वेळेत परतफेड होण्याकरिता, ज्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्था दिनांक ०१ एप्रिल, २०२५ पासून भांडवली मूल्याधारित (Capital based) मालमत्ता कर आकारतील अशाच नागरी स्थानिक स्वराज्य संस्था या योजनेंतर्गत कर्जासाठी पात्र ठरतील. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे उत्पन्न वाढावे व कर्जाची नियमित परतफेड होण्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्यात येतील तसेच, या योजनेतील पात्रतेविषयक निकषांमध्ये आवश्यकतेनुसार शासनाकडून वेळोवेळी सुधारणा करण्यात येतील

७. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेस मालमत्ता कर व अन्य मार्गाने मिळणारे उत्पन्न ESCROW बँक खाते उघडून त्यात जमा करणे बंधनकारक राहील व सदर खात्यातून MUIDCL / MUIF च्या

मुद्दल व व्याजाची नियमित परतफेड करणे आवश्यक राहील, त्याकरिता आवश्यक ठराव व अन्य कागदपत्रांची पूर्तता करून MUIDCL / MUIF सोबत करार करणे बंधनकारक राहील. सदर कराराचा मसुदा MUIDCL / MUIF कडून उपलब्ध करून देण्यात येईल.

८. या योजनेंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना मंजूर करण्यात येणाऱ्या कर्जाच्या रक्कमेतुन MUIDCL / MUIF संस्थेस प्रशासकीय खर्चासाठी कमाल ०.१० % रक्कम अनुज्ञेय राहील.

९. या योजनेंतर्गत कर्ज मंजूरीच्या प्रस्तावास मान्यता देण्याचे व कर्जाच्या अटी व शर्ती निश्चतीचे अधिकार MUIDCL / MUIF च्या संचालक मंडळास प्रदान करण्यात येत आहेत. सदर कर्जास अंतिम मान्यता सचिव / प्रधान सचिव / अप्पर मुख्य सचिव, नवि-२, नगर विकास विभाग यांची राहील.

१०. केंद्र पुरस्कृत अमृत २.० योजनेंतर्गत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेस मंजूर पाणी पुरवठा प्रकल्पातील स्वहिश्यासाठी आवश्यक असलेली रुपये ८२२.२२ कोटी रक्कम MUIDCL / MUIF ने कर्ज स्वरूपात प्राधान्याने मंजूर करून उपलब्ध करून द्यावी व आवश्यकता भासल्यास शासन या कामी MUIDCL / MUIF संस्थेस शासन अग्रिम निधी मंजूर करेल व वित्तीय संस्थाद्वारे MUIDCL / MUIF ने कर्जाची उभारणी केल्यानंतर सदर रक्कम MUIDCL / MUIF ने शासनास प्राथम्याने परत करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०८२०१७१७५००७२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

SHRIKANT CHANDRAKANT ANDGE

Digitally signed by SHRIKANT CHANDRAKANT ANDGE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=5d5ab93b4e4f2fcd87e12fe19b8965025d482b1bee0fffaa62085c34db6bfd8c, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=D8D9626C9E038380CD235C048F20D7CE74CFFD3A95F2AC3C192E9C991F358271, cn=SHRIKANT CHANDRAKANT ANDGE
Date: 2024.08.20 17:46:02 +05'30'

**(श्रीकांत आंडगे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा .मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. उप मुख्यमंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) विभाग यांचे खाजगी सचिव.
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग यांचे स्वीय सहायक.
७. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग यांचे स्वीय सहायक.
८. प्रधान सचिव, पाणीपुरवठा विभाग यांचे स्वीय सहायक.
९. प्रधान सचिव, नगर विकास विभाग (२) यांचे स्वीय सहायक.
१०.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

११.व्यवस्थापकीय संचालक, एम. यु. आय. डी. सी. एल. / एम. यु. आय.एफ., मुंबई.

१२.आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई.

१३. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय, मुंबई

१४. सर्व विभागीय आयुक्त.

१५. सर्व जिल्हाधिकारी.

१६. सर्व आयुक्त, महानगरपालिका.

१७. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत.

१८. निवड नस्ती, नवि-३३.